## थोडक्यात...

### राणी सावरगांव जिल्हा परिषद गटाचे सदस्य सय्यद अल्ताफ यांचा सत्कार



(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा-** राणीसावरगाव जिल्हा परिषद गटाचे भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सय्यद अल्ताफ यांनी चारठाणा येथील भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता त्यांचा आबेद देशमुख व तहेसीन देशमुख यांनी सत्कार केला यावेळी एकबालोद्दीन काजी,बबनराव देशमुख,शिवाजी घुगे,सचिन घाटुळ,चिंतामण दौंड,बद्रोद्दीन काजी,शेख जावेद,ज्ञानेश्वर म्हेत्रे,डॉ आमेर काजी,सलाम इनामदार,अमोल भवरे,विशाल निकाळजे,बाबासाहेब म्हेत्रे,मोहसिन देशमुख,श्रीपाद देशपांडे,पत्रकार शारेक देशमुख,प्रभाकर कुऱ्हे,सय्यद आर्शद,शेख साजेद,सनिम देशमुख,जुबेर देशमुख,नबिखा पठाण,स. तय्यब अली,सय्यद मोहसिन,हसनैन देशमुख यांच्या सह आदींची उपस्थिती होती.

### गटकळ अकॅडमीची विद्यार्थी नी नेहा काळे बीड पोलीस मध्ये भरती



(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)

**सेलू-** अलीकडे जाहीर झालेल्या बिड राज्य पोलीस भरती प्रक्रियेत नेहा रंगनाथ काळे यांची यशस्वी निवड झाली असून त्यांनी आपल्या कुटुंबासह गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. कठोर परिश्रम, जिद्द, वडील व मोठ्या भावाचे मार्गदर्शन सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. वडील पण पोलीस दलात होते, मि पण पोलीस च होणार , नेहा लहानपणापासूनच पोलीस दलात सेवा करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या नेह काळे यांनी दिवस-रात्र मेहनत घेत स्पर्धा परीक्षेची तयारी केली. शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत त्यांनी अंतिम यादीत स्थान मिळवले. त्यांच्या या यशामुळे काळे कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण असून सेलू मधुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेक मान्यवरांनी त्यांच्या घरी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना नेहा काळे म्हणाल्या , हे यश माझ्या आई-वडिल, मोठा भाऊ व गटकळ सर यांच्या पाठिंब्यामुळे आणि गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळे मिळाले. पुढे प्रामाणिकपणे सेवा देण्याचा माझा प्रयत्न राहील. दरम्यान, त्यांच्या या यशामुळे इतर तरुणी ना हि प्रेरणा मिळणार असून भविष्यात अधिक मुलीनी अश्या स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी व्हावे,

# दक्षिण मुंबईत श्रीराम जन्मोत्सव सोहळयाचा भाविकांनी लुटला मनसोक्त आनंद

## रामनवमी निमित्त कुलाब्यासहित गिरगांव, कॉटन ग्रीन परिसरात भाविकांत उत्साह

(दिनेश मराठे/दै.धर्मयोध्दा)

**मुंबई -** दक्षिण मुंबईत सर्व भाविकभक्तांनी भगवान श्रीराम जन्मोत्सवाचा रामनवमीच्या सोहळ्याचा आनंद लुटत मोठा जल्लोष साजरा केला.लोकमान्य टिळक मार्ग येथील वीर भंजन हनुमान मंदिरात श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी विभागातील भाविक श्रीराम जन्म सोहळयास उपस्थित होतें. कुलाबा बजरंग दलाचे दशरथ पांडे, नितेश पाठक आणि मनोहर राठोड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कुलाबा ते हनुमान मंदिर अशी केशरी ध्वज फडकवीत बाईक रॅली काढत आनंद साजरा केला.यावेळी त्यांनी जय श्री रामच्या घोषणा दिल्या. गिरगांव येथील आत्माराम बुआ काळाराम मंदिर येथे हि गिरगांवकरांनी श्रीरामाच्या जन्मोत्सवाचा आनंदमय सोहळा साजरा केला. गिरगांवकर भाविक भक्तगण,प्रदीप राणे आणि त्यांचे सहकारी यांनी श्रीराम जन्मोत्सवा निमित्ताने फुलांच्या माळांची आरास करीत मंदिर सजविले होते.डोंगरी येथील चिनवाला बिल्डिंग येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या हर्षल्हासात संपन्न झाला. श्रीरामाचा जयघोष करीत श्रीरामाची पालखी मिरवणूक नगर प्रदक्षिणा घालीत काढण्यात आली.यावेळी अभिषेक, सचिन मयेकर,विजय तांबे यांच्यासह महिला सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. सायंकाळी विविध कार्यक्रम संपन्न झाले. दुपारी श्रीरामाचा जन्म सोहळा पाळणा गीत गात करण्यात आला. श्रीराम याग होमहवन आदी धार्मिक विधी करण्यात आला. गिरगांवच्या झावबा वाडीत राम मंदिरात रामनवमी उत्सव समारंभासमयी श्रीराम मंदिरात सर्व भक्तांचे



उत्साहात स्वागत करण्यात आले. रामनवमीला रामजन्मासाठी एक खास रामललाची मुर्ती बाहेर काढली गेली आणि उत्सव साजरा करण्यात आला. संपूर्ण मंदिर वेगवेगळ्या रंगांच्या आकर्षक फुलांनी सजवण्यात आले होते, प्रभू रामाची स्तुतीगीते गायली गेली. भाविकांना विशेष मिठाई आणि वाटप करण्यात आले.श्री रामचा जप करणारे शंभर आवाज ऐकणे हा एक अवर्णनिय अनुभव भक्तांना अनुभवण्यास मिळाला.जय राम जयजय राम सुमधर स्वरात कर्णी गुंजल्याचे भाविकांनी सांगितले. मुंबईतील आणि गिरगांवातील भाविक प्रभू रामाच्या दैवी जन्म सोहळ्यात प्रत्यक्ष सान्निध्यात असल्याची अनुभूती घेण्यासाठी या मंदिरात भाविकांची उपस्थिती होती.भाविकांच्या स्वागताला मंदिराचे व्यवस्थापक उदय शंकर झावबा आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

गुरुवार सकाळपासून रात्री पर्यंत मंदिरात श्रीराम पूजन, अभिषेक, महाआरती, म्हाप्रसाद आणि हनुमान चालीसाचे पठण करण्यात आले. दिवसभरात विविध धार्मिक कार्यक्रम होऊन श्रीराम रक्षा पठण झाले असे निलेश झावबा यांनी सांगितले.

ठाकूरद्वार नाक्यावरील काळाराम मंदिरात राम नवमी निमित्त भाविक भक्तांचे स्वागत करण्यात आले असे समीर रणजित यांनी सांगितले. तर येथील काळाराम मंदिरातील श्रीराम,माता सीता, भ्राता लक्ष्मण आणि सेवक बजरंगबली हनुमान यांचे पहाटे पूजन,महाअभिषेक, आरती, महा प्रसाद, रामनाम जप धून, श्रीराम बाललीला कथा, हनुमान चालीसा आणि सुश्राव्य भजन करण्यात आले अशी माहिती प्रदीप राणे यांनी दिली.

कुलाबा, कफ परेड, मलबारहिल, ताडदेव, गिरगांव, मुंबई सेंट्रल, भायखळा, माझगाव, डोंगरी उमरखाडी, परळ, लालबाग, करिरोड, बकरी अड्डा, शिवडी, वडाला आणि कॉटनग्रीन परिसरात असलेल्या विविध देवी देवतांच्या मंदिरात भव्य स्वागत कार्यक्रम, पालखी सोहळा भजन आणि कीर्तनाच्या आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

डोंगरी, उमरखाडी येथील विविध सामाजिक संस्था, श्रीराम मंदिर, उमरखाडी श्री गणेश मंदिर येथील मुख्य मार्गांवर भव्य आणि आकर्षक रंग संगतीने साकारलेल्या कलात्मक रांगोळीच्या नक्षिकामांची कला आणि त्यातील विविधता दृष्टीस पडली.बुंदीच्या लाडुंचे आणि मिठाईचे वाटप, रामनामाच्या टोप्या, जय श्रीरामची भगवी, केशरी आणि लाल चित्रांची छापील आकर्षक दुपट्टे आणि मफलर गळ्यात घालून मोटर सायकलवर रामध्वज, हनुमान ध्वज मिरवत निघणारी तरुणांची आणि तरुणीची रॅली, ढोलताशा पाठकांच्या गजरात होणारी सामूहिक वादनाची जुगलबंदी हि पहायला भाविकांना पहायला मिळाली.

कॉटन ग्रीन येथिल अपार कष्टकरणाऱ्या माथाडी कामगार आणि मिल कामगारांच्या सुख दुःखाच्या क्षणाचे साक्षीदार असलेल्या आणि बा विठ्ठला म्हणून हाक दिल्यास त्याला प्रतिसाद देणाऱ्या श्रीरामजी टेम्पल ट्रस्ट मंदिरात रामजन्माचा आनंदमय उत्सव साजरा करण्यात आला.कॉटन ग्रीनच्या श्रीराम मंदिरात श्रीराम, सीतामाता आणि बंधू लक्ष्मण यांचे सहित पवनसूत हनुमान यांपासून साकारलेल्या चित्ताकर्षक मनमोहक संगमरवरी आकर्षक वस्त्र, स्वर्णाभूषनांनी मुर्त्या साजविण्यात आली.

श्रीराम जन्म सोहळा असल्याने आम्ही पहाटे पाच वाजता मंदिरात श्रीरामाची शोडष उपचारांनी पूजन अभिषेक केला.सकाळी सव्वासहा वाजता भाविकांसाठी मंदिर दर्शन सोहळ्यास उघडले आणि सकाळी ९ वाजता पूजन महाआरती करण्यात आली. भजन, कीर्तन आणि रामरक्षा पठण तसेच लाडू, पेढे आणि मिठाईचे खास भाविकांना वाटप करण्यात आले.दिवसभरात विविध कार्यक्रम,रात्री दीपोत्सव होईल असे बाबासाहेब मिसाळ यांनी सांगितले.

मुंबादेवी आणि महालक्ष्मी मंदिरात राम नवमी निमित्त विशेषपूजा संपन्न करण्यात. मुंबईची ग्रामदेवता असलेल्या मुंबादेवी मंदिर, महालक्ष्मी मंदिर आणि गिरगांव चौपाटी येथील बाबुलनाथ मंदिरात स्थापित देवतांची मुंबादेवी माता, अन्नपूर्णा माता, महालक्ष्मी मंदिरात श्री महाकाली महासरस्वती महाकाली तसेच बाबुलनाथ मंदिरात महादेवाचे शिवलिंग यांचे खास फुलांची सजावट करून विशेष पूजन,अभिषेक, महा आरती,प्रसाद वाटप असे कार्यक्रम संपन्न झाले.

सायंकाळी बाल राष्ट्रीय पुरस्कार विजेते अर्णव महर्षी यांना श्रीराम बाल वैभव पुरस्कार भायखळयाचे आमदार मनोज जामसुतकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी नगरसेविका सौं.सोनम जामसुतकर, शिवसेनेचे विभाग प्रमुख रुपेश पाटील,नगरसेविका सौं.संपदा मयेकर,शिवांश सिंग व मंडळाचे अध्यक्ष संतोष आढळराव सरचिटणीस सचिन मयेकर आणि सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

Dharmayoddha.com

## "चार्वाक दर्शन मंचचे भोंदू बाबा विरोधी निवेदन; महात्मा फुले ते दाभोळकरांचा वारसा धोक्यात, वैज्ञानिक दृष्टिकोनाची हाक!"

(अली चाऊस/दै.धर्मयोध्दा)

**गंगाखेड-** राज्यात वाढत चाललेल्या भोंदू बुवा-बाबांच्या प्रकारामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला गंभीर धक्का बसत असून महात्मा फुले ते डॉ. दाभोळकर यांच्या वैज्ञानिक वारशावरच गदा येत असल्याची तीव्र चिंता व्यक्त करत चार्वाक दर्शन मंच, गंगाखेड यांच्या वतीने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मा. तहसीलदार गंगाखेड यांच्या मार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, राज्यात अलीकडील "खरात फाईल्स"सारख्या प्रकरणांमधून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक तसेच महिलांचे लैंगिक शोषण उघडकीस आले आहे. मात्र हे प्रकरण केवळ एका मोठ्या साखळीतील एक भाग असून अशा अनेक घटना अजूनही अंधारात दडलेल्या असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. समाजात गुरु, गुरुमावली, महाराज, स्वामी, हभप, धर्मगुरू, ज्योतिषी, योगी, महायोगी अशा विविध पदव्या लावून वावरणाऱ्या व्यक्तींमुळे अंधश्रद्धेचे जाळे अधिकच घट्ट होत असल्याचे निवेदनात



स्पष्ट करण्यात आले. अशा व्यक्तींकडून दोरे-गंडे, खडे, रत्न, कर्मकांड यांचा आधार घेऊन सामान्य लोकांची मानसिक फसवणूक, आर्थिक पिळवणूक तसेच महिलांचे शारीरिक व मानसिक शोषण होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. चार्वाक दर्शन मंचाने या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडे काही ठोस मागण्या केल्या आहेत. यामध्ये अशा सर्व स्वयंघोषित गुरु-बाबांची चारित्र्य पडताळणी करणे, त्यांच्या संपत्तीची चौकशी करणे, त्यांनी वापरलेल्या पदव्यांची सत्यता तपासणे आणि त्यांच्या विरोधातील तक्रारी सार्वजनिक व गोपनीय पद्धतीने मागवण्याची यंत्रणा उभारणे यांचा समावेश आहे. तसेच दोषी आढळणाऱ्यांवर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र हा महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या प्रबोधनवादी विचारांचा वारसा लाभलेला राज्य आहे. या विचारसरणीला पुढे नेण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे, गौरी लंकेश, प्रा. कलबुर्गी यांनी प्राणाची आहुती दिली. त्यांनी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. मात्र आज भोंदूगिरीच्या वाढत्या प्रभावामुळे हा वारसाच धोक्यात आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दरम्यान, काही अलीकडील घटनांमध्ये महिलांची फसवणूक व अत्याचाराचे प्रकार समोर येत असून त्यामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अशा घटनांना आळा घालण्यासाठी सरकारने तात्काळ कठोर पावले उचलणे आवश्यक असल्याचे मंचाने स्पष्ट केले आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हे सरकारचे संवैधानिक कर्तव्य असून अंधश्रद्धेला कुठेही थारा दिला जाऊ नये, यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी ठाम भूमिका या निवेदनातून मांडण्यात आली आहे. यावेळी कॉ. ओंकार पवार, सुरेश इखे, शिवाजी कांबळे, कॉ. योगेश फड, संदीप जाधव, राहुल साबणे आदी उपस्थित होते.

## बोरी जि.प. शाळेत मान्यवरांचा सत्कार मतदार यादी दुरुस्तीबाबत मार्गदर्शन





(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)

**बोरी-** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील जिल्हा परिषद प्रशाला बोरी येथे जिल्हा परिषद सदस्या दिपालीताई चौधरी व पंचायत समिती सदस्या लक्ष्मीताई कनकुटे यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रवीण रांजवन सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अजय भैय्या चौधरी, माजी सरपंच सखाराम तात्या शिंपले, नागरे आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा परिषद प्रशाला बोरी च्या प्रांगणात चारी शाळेच्या वतीने नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य बोरी गण यांचा सत्कार करण्यात आला या वेळी परिसरातील बी.एल. ओ. यांना मतदार याद्यांची पडताळणी, नाव शोधणे तसेच मतदार व त्यांच्या कुटुंबीयांच्या नावांतील चुका दुरुस्त करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात संतोष तायडे, अजय भैय्या चौधरी व दिपालीताई चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच गोपाळ बिर्ला मित्र मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष चिद्रवार यांनी केले, तर सूत्रसंचालन गजानन घुगे आभार शिरीष बोरोळे सर यांनी केले. या प्रसंगी अश्विनीताई चौधरी, बाबर पठाण, भगवानराव चौधरी, माजी उपसरपंच अश्विनीताई चौधरी, केंद्रप्रमुख शेफी सर, सविता नाना चौधरी, राहुल कुलकुटे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी श्रीमती लझडे मॅडम शंकरराव खिस्ते मिलिंद माटे मारवाडे मॅडम रामटेके मॅडम अश्विनी सोनवणे राजेश वैद्य संघमित्रा खिल्लारे सरदार मामू काळे मामा आव्हाड सर यांनी परिश्रम घेतले

## सेलू तहसील कार्यालयात संजय गांधी निराधार समितीची बैठक संपन्न



(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)

**सेलू-** आज संजय गांधी निराधार समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी नवनियुक्त सर्व समिती सदस्यांचा सेलू तालुक्याचे तहसीलदार डॉ.शिवाजी मगर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आजच्या या पहिल्या बैठकीमध्ये एकूण ४८३ निराधार लाभार्थ्यांच्या फाईल्सवर स्वाक्षऱ्या करून त्या मंजुरीसाठी पुढे पाठवण्यात आल्या. बैठकीदरम्यान विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सेलू तालुक्याचे तहसीलदार डॉ.शिवाजी मगर , निराधार समितीचे अध्यक्ष रामभाऊ डख, तालुकाध्यक्ष गणेशराव काटकर तसेच समिती सदस्य अशोक शेलार, काका आवटे, अजित मोगल, कृष्णा नरवटे, दिगंबरराव भुजबळ, अझर भाई पठाण व शुभम खंदारे हे सर्व उपस्थित होते. बैठकीत विशेषतः दलाल व एजंटांकडून निराधार लाभार्थ्यांची होणारी आर्थिक फसवणूक व हानी याबाबत गंभीर चर्चा करण्यात आली आणि यावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विचारविनिमय झाला. तसेच, गरजू लोकांच्या फाईल्सवर विशेष लक्ष देण्यात यावे, ही प्रामुख्याने मागणी करण्यात आली. तसेच, उर्वरित प्रलंबित फाईल्सवर स्वाक्षऱ्या करण्यासाठी पुढील बैठक एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले.यावेळी नायब तहसीलदार पुरवठा, विभाग प्रमुख जोंधळे मॅडम वाकुडे, पेशकार हरीश टाक यांची उपस्थिती होती

## इराणच्या सरकारने बेकायदेशीरपणे अटकेत ठेवलेल्या निर्दोष पैवंद नईमीच्या सुटकेसाठी बहाई धार्मियांचे जगापुढे साकडे

(दिनेश मराठे/दै.धर्मयोध्दा)

**मुंबई -** गेले तीन आठवडे इराणमध्ये युद्धजन्य परिस्थिती असून अमेरिका, इस्राईल आणि इराण यांचे युद्धस्य वातावरण आहे. इराणच्या सरकारने बेकायदेशीरपणे अटकेत ठेवलेल्या निर्दोष बहाई धर्मीय पैवंद नईमी नामक तरुणाच्या सुटकेसाठी बहाई धार्मियांनी जगापुढे प्रार्थनाकरीत सुरक्षितपणे सुटका व्हावी अशी मागणी केल्याची माहिती मुंबईत बहाई सेंटरच्या सचिव नर्गिस गौर यांनी दिली. या संदर्भात त्यांनी म्हटले कि, बहाई धर्मीय तरुण पैवंद नईमी नावाच्या एका तरुणाला इराणमध्ये त्याच्या बहाई धर्माविषयी असलेली श्रद्धा आणि विश्वास हा त्याचा गुन्हा ठरवित अटक करून तुरुंगात ठेवले आहे ८ जानेवारीत इराण मध्ये झालेल्या आंदोलनादरम्यान



पैवंद नईमीला निराधार आरोपांखाली अटक करण्यात आली आणि कठोर वागणुकीसाठी ओळखल्या जाणाऱ्या इराण रिव्होशनरी गार्ड कमांड () आयआरजीसी च्या नजरबंदी केंद्रात नेण्यात आले. त्यानंतर जे घडले ते अत्यंत विचलित करणारे होते. त्याची दीर्घकाळ चौकशी करण्यात आली, त्याला अन्न आणि पाण्यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले, त्याला वारंवार मारहाण करण्यात आली आणि दोनदा बनावट फाशी देण्यासही भाग पाडले गेले.हे कृत्य आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र मानसिक छळ म्हणून ओळखले जाते.

आरोपित गुन्ह्यांच्या वेळी तो आधीच ताब्यात असूनही, त्याच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आले आणि खोटा कबुलीजबाब देण्यास भाग पाडले गेले, जो नंतर सरकारी दूरदर्शनवर वाहिणीवर प्रसारित करण्यात आला. त्यांच्यावर अद्याप कोणताही खटला चाललेला नाही, कोणताही पुरावा सादर केलेला नाही, आणि तरीही तो तुरुंगातच आहे.

गेल्या काही आठवड्यांत अनेक कैद्यांची सुटका झाली असली तरी, इतर बहाईंप्रमाणेच, केवळ त्यांच्या श्रद्धेमुळे लक्ष्य बनून पैवंद अजूनही कोठडीत आहेत. त्यांची शारीरिक आणि मानसिक स्थिती सतत खालावत आहे. त्यांना वैद्यकीय उपचार नाकारण्यात आले आहेत, एकांतवासात ठेवण्यात आले आहे आणि त्यांच्यावर सतत दबाव टाकला जात आहे. त्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या जीवाची गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

१९७९ पासून, इराणमधील बहाई समुदायाला पद्धतशीर छळाचा सामना करावा लागत आहे आणि राष्ट्रीय संकटांच्या काळात अनेकदा त्यांना बळीचा बकरा बनवले गेले आहे. पैवंद यांचे प्रकरण या सततच्या अन्यायाची आणखी एक वेदनादायक आठवण करून देते.

जागतिक बहाई समुदाय आता तातडीने लक्ष देण्याचे आणि कारवाई करण्याचे आवाहन करत आहे.त्यांच्या सुरक्षेची खात्री करण्यासाठी आणि अशा प्रकारच्या क्रूरतेला आळा घालण्यासाठी जिनिव्हा येथील आंतर राष्ट्रीय बहाई समुदाय आपल्यापरीने प्रयत्नशील असल्याचे बहाईसमुदायाच्या आध्यात्मिक सभेच्या सचिव नर्गिस गौर यांनी म्हटले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao